

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात अनेक धक्कादायक बाबी

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक २२/05/२०25 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 113 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# पिंपरी चिंचवड मध्ये तिरंगा रॅली

## ऑपरेशन सिंदूरचं देशभर कौतुक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर यशस्वी करत पाकिस्तानातील अतिरेक्यांचे नऊ केंद्र उद्ध्वस्त केल्याबद्दल भारतीय सेनादलाचे अभिनंदन करण्यासाठी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे.**




महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे च्या आदेशानुसार तसेच शिवसेना उपनेते इरफान भाई सय्यद ,जिल्हाप्रमुख भगवानशेठ पोखरकर व भोसरी विधानसभा शहर प्रमुखn संभाजीराव शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सेनेच्या सन्मानार्थ आजपिंपरी चिंचवड शहरातील भोसरी विधानसभा मध्ये भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली.सदर तिरंगा यात्रेला मोठ्या उत्साहामध्ये शिवसैनिकांनी,युवकांनी ऑपरेशन सिंदूरच्या ऐतिहासिक विजयाबद्दल सहभाग घेत भारतीय सैन्याचा जय-जयकार केला.

यावेळी तिरंगा रॅलीमध्ये शिवसेना महिला उपनेत्या सौ. सुलभाताई उबाळे ,शिवसेना नेते निलेश मुटके,शिवसेना खेड तालुकाप्रमुख निलेश पवार , दादासाहेब उर्फ संतोष उकिर्डे (स्वतंत्र पत्रकार संपादक संघ पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष),युवा सेना जिल्हा उपप्रमुख अरुण जोगदंड , विभागप्रमुख श्रीकांत सुतार, सर्जेराव कचरे, संदीप जाधव, शिवसेना पदाधिकारी ,विभाग प्रमुख व शाखाप्रमुख आदि मान्यवर उपस्थित होते.

# मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्प

## भंडारा डोंगराला भेदून जाणार नाही

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : श्री क्षेत्र भंडारा डोंगर हे वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान आहे. डोंगराशी वारकरी संप्रदायाच्या भावना जोडल्या आहेत. त्यामुळे मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचा मार्ग वळविण्यात येईल. डोंगराला बोगदा पाडून हा प्रस्तावित मार्ग करण्यात येणार नसल्याचे आश्वासन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिले असल्याचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी



सांगितले.मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी सर्व्हे झाला होता. हा प्रस्तावित मार्ग डोंगराला बोगदा पाडून करण्यात येणार होता. याबाबत वारकरी संप्रदायाने चिंता व्यक्त केली होती.

खासदार श्रीरंग बारणे यांची भेट घेतली होती. त्यानंतर खासदार बारणे यांनी भंडारा डोंगर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद यांच्यासह रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची दिल्लीत भेट घेतली.

प्रस्तावित मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचा मार्ग वळविण्याची विनंती केली. ही विनंती रेल्वेमंत्री वैष्णव यांनी मान्य केली आहे. खासदार बारणे म्हणाले, प्रस्तावित मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन मार्गासाठी सर्वेक्षण झाले आहे.

हा मार्ग श्री क्षेत्र भंडारा डोगर या पवित्र तीर्थक्षेत्रातून एका बोगद्यातून जाणार होता.

संत तुकाराम महाराजांचे कर्मभूमी म्हणून हे स्थान संपूर्ण महाराष्ट्रातील आणि देशभरातील वारकरी संप्रदायासाठी अत्यंत श्रद्धेचे स्थान आहे. वारकऱ्यांच्या भावना डोंगराशी जोडल्या आहेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक २२/05/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# वीज पुरवठ्याचे तीन तेरा नऊ बारा

## चाकण औद्योगिक परिसर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरात औद्योगिक किंवा MIDC च्या जागा शिल्लक नसल्याने याच औद्योगिक परिसरातील उद्योजक हे चाकण औद्योगिक परिसर जवळ असल्याने याच औद्योगिक परिसरात उद्योगाचे नवीन जागेत विस्तारीकरण करत आहेत. तसेच नवीन आंतरराष्ट्रीय कंपन्याच्या संख्येत वाढ होत आहे. या परिसरात उद्योगांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने त्याचा परिणाम हा महावितरणवर वीज पुरवठा करण्याकरिता अधिक भार पडत आहे. त्यांच्याकडून सुरळीत वीज पुरवठा केला जाऊ



शकत नाही. कारण या चालू मे महिन्यात चाकण औद्योगिक परिसरात वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण खूपच वाढलेले आहे. दि 19 व 20 मे 2025 या दोन दिवसांत महावितरण कडून पूर्णवेळ म्हणजे 48 तास वीज पुरवठा उपलब्ध होऊ शकला नाही. मागील आठवड्यात महावितरणचे अभियंते व संबंधित अधिकारी आणि उद्योजक यांची मीटिंग होऊन सुद्धा वीज पुरवठ्यावर त्याचा काहीच चांगला परिणाम झाला नाही.

या चाकण औद्योगिक परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडित होण्यामुळे यांचा परिणाम हा उद्योगांवर मोठ्या प्रमाणावर होऊन या परिसरातील उद्योजकांचे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. या नुकसानीला जबाबदार कोण? हा प्रश्न उद्योजकाना पडला आहे महावितरण हे नुकसान भरपाई देणार का?

तरी या औद्योगिक परिसरात महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यानी योग्य ते नियोजन करून त्यांच्याकडून केला जाणारा वीजपुरवठा अखंडित ठेवण्यासाठी योग्य ते प्रयत्न करावेत व उद्योजकाचे होणारे नुकसान कमी करण्यास सहकार्य करावे अशी उद्योजकांची मागणी आहे.

सदर माहिती ही पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे संचालक भारत नरवडे यांनी दिली.

# सिंधी समाजाला मिळणार जमीन मालकीचा हक्क !

## महाराष्ट्र राज्य सरकार वतीने विशेष अभय योजना लागू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : भारत-पाकिस्तानच्या विभाजनानंतर महाराष्ट्रामध्ये मोठ्या संख्येने सिंधी समाज स्थापित झाले, आता सिंधी समाजाला आपल्या जमिनी संदर्भात मालकी हक्क प्रदान होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने विशेष अभय योजना २०२५ लागू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. ही योजना अशा परिवारांसाठी आहे, ज्यांच्या



जमिनी अनेक दशकापासून महाराष्ट्र राज्यात नियमित करण्यात आल्या नाहीत, राज्य शासनाच्या या योजनेचा मुख्य उद्देश सामाजिकदृष्ट्या आत्मनिर्भरता निर्माण करण्यावर आहे. जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहे की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात यावे, त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना या अभय योजनेचा लाभ घेता येईल.पिंपरी चिंचवड शहराचे माजी महापौर हिरानंद उर्फ डब्बू आसवानी यांनी महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

त्यांनी शासनाचे आभार व्यक्त करताना आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरात तसेच महाराष्ट्रात अनेक भागात सिंधी समाज अनेक वर्षापासून राहत आहे. सिंधी समाजाच्या वतीने अनेक वर्षापासून या निर्णयाची मागणी होत होती. पिंपरी कॅम्प मध्ये राहणारे अडीचशे ते तीनशे परिवारांना या योजनेचा थेट लाभ मिळणार आहे. ही अभय योजना सिंधी समाजाला सन्मान आणि सुरक्षा देणारे प्रतीक ठरले आहे, या योजनेमुळे सिंधी समाजाला खऱ्या प्रमाणात न्याय मिळाला आहे, असे हिरानंद उर्फ डब्बू आसवानी यांनी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले.

# वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात अनेक धक्कादायक बाबी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड: राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते राजेंद्र हगवणे यांच्या सुनेच्या आत्महत्येप्रकरणी शवविच्छेदन अहवाल समोर आला असून यात अनेक गोष्टी समोर आल्या आहेत.

शुक्रवारी राहत्या घरी वैष्णवी शशांक हागवणे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. यानंतर एकच खळबळ उडाली.



वैष्णवी यांना सासरच्या मंडळीकडून मानसिक आणि शारीरिक जाच होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हुंड्यामुळे हा छळ केला असल्याचं पोलीस तक्रारीत म्हटलं आहे. ज्यावेळेस ही घटना घडली तेव्हा घरामध्ये आजीसासू, कामवाली, घर गड्याची मुलगी होती, हे पोलीस तपासात समोर आल आहे.या प्रकरणामध्ये सीसीटीव्ही तपासण्यात आले असून अनेक गोष्टी समोर आल्या आहेत. दरम्यान, वैष्णवी शशांक हगवणे यांचा शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. अहवालात हत्या आणि आत्महत्या दोन्ही घटना घडू शकतात. असा संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणामध्ये पोलीस पारदर्शक तपास करत असल्याचं बावधन पोलिसांनी सांगितल आहे. अद्याप ही बावधन पोलिसांच्या हाती राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे हे लागले नाहीत. दोन्ही वडील आणि मुलाचा शोध पोलीस घेत आहेत. ते निर्दोष असतील तर ते फरार का? आहेत. असा ही प्रश्न विचारला जात आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक २२/05/२०२5

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य कुशल प्रशासनाचे प्रतीक -शत्रुघ्न काटे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंती वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश यांच्यावतीने राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने भाजप पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) च्यावतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेता यावी, यासाठी दिनांक २१ ते ३१ मे २०२५ या कालावधीत अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी दिली.**






अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त मोरवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालय येथे आज, बुधवार रोजी कार्यशाळा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, माजी आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, कार्यशाळेच्या वक्त्या कीर्तनकार शारदाताई मुंडे, संयोजक शितल शिंदे आदी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या निमित्ताने पक्षाच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देत, पदाधिकाऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले; "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची 300 वी जयंती ही केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांचे कार्य हे समाजसेवा, धर्मनिष्ठा आणि कुशल प्रशासनाचे प्रतीक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले हे कार्यक्रम जनतेला त्यांच्या महान कार्याची आठवण करून देतील आणि युवा पिढीला प्रेरणा देतील. भाजपच्या वतीने आम्ही त्यांच्या आदर्शांना वंदन करतो आणि हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कटिबद्ध आहोत."

माजी आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या की; "अहिल्यादेवी होळकर या स्त्रीशक्तीचे ज्वलंत उदाहरण आहेत. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही समाजासाठी मोठे योगदान दिले. महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे कार्य नेहमीच प्रेरणादायी राहील. त्यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले विविध कार्यक्रम त्यांना आदरांजली वाहण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ देतील. मला विश्वास आहे की, या कार्यक्रमांमधून अनेक महिला त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेतील." माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे म्हणाल्या की; "अहिल्यादेवी होळकर यांनी केवळ राज्याचाच नव्हे, तर संपूर्ण देशाचा लौकिक वाढवला. त्यांचे प्रशासकीय कौशल्य आणि लोककल्याणकारी दृष्टिकोन आजही अनुकरणीय आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा आणि परिसंवादांचे आयोजन करून आम्ही त्यांच्या विचारांना आणि कार्याला पुन्हा एकदा लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत. हे कार्यक्रम युवकांना इतिहासाची जाणीव करून देण्यास मदत करतील."

कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या शारदा ताई मुंडे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती दिली. त्या म्हणाल्या की; "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी धर्म, संस्कृती आणि समाज यांच्या संवर्धनासाठी केलेले कार्य अतुलनीय आहे. त्यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त आयोजित हे विविध कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला अधिक समृद्ध करतील. भाजप महाराष्ट्राच्या वतीने आम्ही हे सुनिश्चित करत आहोत की, हे कार्यक्रम केवळ प्रतीकात्मक न राहता, त्यातून समाजोपयोगी संदेश जनतेपर्यंत पोहोचावा." कार्यक्रमाचे संयोजक शीतल शिंदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) भाजपाच्या वतीने शहरात विविध गुणात्मक आणि संख्यात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती दिली. शहरातील 14 मंडल निहाय कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमांमध्ये घाट पूजन, मंदिरे पूजन, साफसफाई स्वच्छता अभियान, चित्ररथ, नाटक, शोभायात्रा, प्रदर्शनी भरवणे, स्टिकर तयार करणे, बुक पुस्तक वाटप करणे, प्रभावि महिला व युवा मेळावे घेणे इत्यादींचा समावेश आहे. प्रत्येक कार्यक्रमासाठी कार्यकर्ते, वक्ते आणि संयोजक यांची नेमणूक करण्यात येणार असून, 21 ते 31 तारखेपर्यंत संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरात कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. यासोबतच, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आयोजित केली जाईल. पत्रकार आणि बुद्धीजीवी यांच्यासोबत चर्चासत्रांचे आयोजन केले जाईल. शैक्षणिक संस्थांमध्ये परिसंवादाचे कार्यक्रम आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर लेख प्रकाशित करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेला दक्षिण आघाडी प्रदेश अध्यक्ष राजेश पिल्ले, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, माउली थोरात, महेश कुलकर्णी, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, धनराज बिरदा, जयंती महोत्सवाचे संयोजक शीतल शिंदे, सरचिटणीस अजय पाताडे, शैला मोळक, माजी नगरसेवक केशव घोळवे, सुरेश भोईर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, मनोज ब्राह्मणकर, माधुरी कुलकर्णी, शर्मिला बाबर, अनुराधा गोरखे, योगिता नागरगोजे, बिभीषण चौधरी, गणेश ढोरे, हर्शल नढे, मोहन राऊत, अजित बुर्डे, शिवराज लांडगे, योगेश सोनावणे, मंगेश धाडगे, रामदास कुटे, धरम वाघमारे, संजय पटनी, समीर जावळकर, नंदकुमार भोगले, विजय शिनकर, दत्तात्रय ढगे, मधुकर बच्चे, मनीषा शिंदे, मनीषा पवार, प्रेरणा चंदाणी, जयश्री मकवाना, कोमल गौंडाडकर, दिपाली केंगारे, सीमा चव्हाण, सुरेश तावरे, सुर्यकांत गोफणे, पोपट हजारे, महादेव कवितके, देविदास साबळे, नामदेव पवार, गणेश ढाकणे, गोरक्षनाथ झोळ, खंडूदेव कठारे, प्रदीप बेंद्रे, सुर्यकांत खंडागळे, मनोजकुमार मारकड, उमेश पवार, विठ्ठल कराळे, दिनेश पाते, रावजी परब, विनोद पाटील, सोपान पाटील, गोरख कुंभार, प्रशांत भागवत, परेश नरुटे, कृष्णा भंडलकर, नेताजी शिंदे, दशरथ शिंदे, संदेश शिंदे, रमेश काळे, पवन तातर, अविनाश गावडे, गणेश लंगोटे, शुभम पिंपळे, राजू ईश्वरकट्टी, रवींद्र पाटोळे, गणेश लोखरे, अशोक केदार, योगेश आकुलवार, दिनेश यादव, गोरख पाटील, अमेय देशपांडे, अजित कुलथे, विशाल डोंगरे, दीपक भंडारी, महेंद्र बाविस्कर, चंद्रकांत शिंदे, मेहुल जोशी, संभाजी नाईकनवरे, गोरख पाटील, संकेत चोंधे, नंदू कदम, सचिन राऊत, हनुमंत लांडगे, रुपाली वाघेरे, रत्नमाला देवमाने, रेणुका हेगडे, रोहन देशपांडे, संजय परळीकर, अतुल पवार, सज्जाद तांबोळी, सचिन सरक आदी पदाधिकारी – कार्यकर्ते उपस्थित राहून कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेचे प्रास्ताविक राजू दुर्गे यांनी केले. सूत्रसंचालन मोरेश्वर शेडगे यांनी तर आभार शैला मोळक यांनी मानले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक २२/05/२०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# दवाखाना व तालीमची नव्याने वास्तू बांधा - नाना काटे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरातील प्रभाग क्रमांक 28 रहाटणी, पिंपळे सौदागर मधील महानगरपालिकेचा दवाखाना व तालीमचे स्ट्रक्चर ऑडिट करून त्या जागी अत्याधुनिक सोयीसुविधायुक्त नव्याने दोन्ही वास्तू बांधण्यात यावा, अशी मागणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी मनपा आयुक्तांना केली आहे.**



दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक 28 रहाटणी, पिंपळे सौदागर मध्ये परिसरातील नागरिकांसाठी महापालिकेच्या वतीने दवाखाना बांधण्यात आला असून, तो सध्या खूप जुना झाला असून नागरिकांसाठी या दवाखान्यातील जागा देखील अपुरी पडत आहे याच दवाखान्यात नागरिकांना बसण्यासाठी येथे तात्पुरत्या स्वरूपात पत्राशेडची उभारणी देखील केलेली आहे तसेच लहान मुलांसाठी या दवाखान्यात लसीकरण देखील असते तेव्हा देखील नागरिकांची गैरसोय होते.तसेच पिंपळे सौदागर गावात अनेक कुस्ती, कबड्डी व विविध खेळातील खेळाडू आहेत, त्यांना व्यायाम सराव करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने तालीम व जिम बांधण्यात आलेली आहे.

या तालमीची देखील वारंवार दुरुस्ती व डागडुजी करण्यात आलेले असून ती सुद्धा जुनी व जीर्ण झालेली आहे, तिथे देखील स्ट्रक्चर ऑडिट करून नवीन बांधण्याची सध्या गरज आहे. त्याच प्रमाणात प्रभाग क्रमांक 28 राहटणी, पिंपळे सौदागर मधील दवाखाना व तालीम या दोन्ही वस्तू सध्या स्थितीत चालू असून त्या जुन्या व जीर्ण देखील झालेले आहेत.

ही बाब विचारात घेता या दोन्ही वास्तूचे स्ट्रक्चर ऑडिट करून नवीन अत्याधुनिक सोयीसुविधायुक्त दवाखाना व तालीम बांधण्यात यावी, असेही सदर निवेदनात नाना काटे यांनी नमूद केले आहे.

# आमदार जगताप यांनी मान्सूनपूर्व कामांची केली 'ऑनफिल्ड' पाहणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड : पावसाळा तोंडावर येऊन ठेपलेला असताना नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी आमदार शंकर जगताप यांनी चिंचवड मतदारसंघातील विविध ठिकाणी थेट पाहणी दौरा करत प्रशासनाला तातडीच्या उपाययोजनांचे आदेश दिले. विविध भागांतील नाल्यांची सफाई, रस्त्यावरील खड्डे, अतिक्रमण, पाण्याच्या निचऱ्याची अडचण आणि वाहतूक व्यवस्थेतील समस्या पाहता, त्यांनी संबंधित विभागांना कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.**



**पुनावळे परिसरात तातडीचे उपाय**

पुनावळे अंडरपास खाली रस्त्यावर असलेल्या खड्ड्यांचे तत्काळ दुरुस्तीचे आदेश देण्यात आले.तसेच जलवाहिन्यांची स्वच्छता करून नवीन स्ट्रॉम वॉटर लाईन टाकण्याची सूचना केली. भारत पेट्रोल पंपासमोरील पाण्याची साचलेली समस्या लक्षात घेऊन तिथेही स्ट्रॉम वॉटर लाईन टाकण्याचा निर्णय झाला. पुनावळे सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण त्वरित हटवण्याचे निर्देशही देण्यात आले.

समीर लॉन्स अंडरपासजवळ जुन्या स्ट्रॉम वॉटर लाईनच्या अडथळ्यामुळे तिथे नवीन लाईन टाकण्याचे आदेश देण्यात आले. किवळे परिसरातील नाल्यांमध्ये अडलेल्या गाळाची सफाई करून स्क्रिनिंगचे अर्धवट काम पूर्ण करण्याच्या सूचना पर्यावरण विभागाला दिल्या.

मुकाई चौक ते वाकडदरम्यान होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता, मुकाई चौकातून वाकडकडे जाणारी वाहतूक एकेरी करण्याचे आदेश बीआरटीएस व स्थापत्य विभागाला देण्यात आले. तसेच वाल्हेकरवाडीतील स्मशानभूमीच्या अपूर्ण कामांची पाहणी करून ती तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

गोखले वृंदावन व शांतीवन सोसायटी समोरील स्ट्रॉम वॉटर लाईनमुळे एन्ट्री पॉइंटवर पाणी साचत असल्याने, तिथे रॅम्प तयार करण्याचे आदेश देण्यात आले. चापेकर चौक ते वाल्हेकरवाडी कॉर्नरपर्यंत स्ट्रॉम वॉटर लाईन टाकून नव्याने रस्ता तयार करण्याचे निर्देशही दिले. सिल्वर गार्डन सोसायटी परिसरात लाईन नसल्यामुळे निर्माण होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्येवर तत्काळ उपाय करण्याचे आदेश देण्यात आले.

**एनएचएआयच्या प्रलंबित कामांवरही सूचना**

एनएचएआयमार्फत सुरू असलेल्या सर्व्हिस रोडच्या कामांची पाहणी करताना आमदार जगताप यांनी संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर काम पूर्ण करून पावसाचे पाणी नीट निचरा होईल, याची खात्री करण्याचे आदेश दिले.

या दौऱ्यात आमदार शंकर जगताप यांच्यासोबत नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यात आल्या व पावसाआधी सर्व पायाभूत सुविधा वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

या दौऱ्यात माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी नगरसेविका संगीताताई भोंडवे, अश्विनीताई चिंचवडे, माजी नगरसेवक राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, मोरेश्वर भोंडवे, हुशार भुजबळ, शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन भुजबळ, पुणे जिल्हा नियोजन समितीच्या सभापती भारतीताई विनोदे, मंडल अध्यक्ष सनी बारणे, मोहन राऊत, सचिन राऊत, नवनाथ ढवळे, श्यामराव वाल्हेकर, शेखर चिंचवडे, दीपक भोंडवे, सोमनाथ भोंडवे, दादा तरस, राम वाकडकर, राहुल काटे, योगेश चिंचवडे, कुणाल भोंडवे, दिलीप राऊत, धर्मपाल तंतरपाळे, प्रदीप साळुंखे, नीलेश भोंडवे, एसीपी कसबे साहेब, N H A I चे कार्यकारी अधिकारी सुभाष घंटे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार, राकेश कोळी, शिर्के, संकेत चिंचवडे, प्रवीण वाल्हेकर, अमेय देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968